६

# ढेंकणाचा पोवाडा.

## रेकॉर्ड नं. No. 456

( नानिवडेकरकृत )

### पोवाडा

अरं मजा काय झाली एका गांवाला । ऐका दादांनो सांगतों तुम्हाला । रावसाब अस्यात त्या गांवाला । सवाल बघा केला सरकाराला । चला म्हनं जाउं या शिकारीला । सरकारानं सवाल काय केला । तुम्ही चला म्होरं आघाडीला । मागोमाग येतो मी रानाला । अन् हत्ती बघा दिला रावसाबाला । रावसाब बसल्याव हत्तीला । अन् हत्ती बघा फेकलाय रानाला । लागलाय तुरु तुरु धांवायला । शेपटी म्होरं लागलाय पळायला । सोंडम्होरं लागलाय धावायला । अईतवार मिरोग नक्षत्राला । अमुशा काळोख्या रातीला । शिकारीला निघाल्या त्या रानाला । पन अरं येडे मोभर वाघाला । घुवड लागलेय वरडायला । टिटवी पन वराडली रानाला । साहेब म्हनतुया मनाला । परसंग दिसतोय नशिबाला । काळजी पर एक भगवानाला । भिऊं नये आपून या वेळला । चावुक मारलाय हत्तीला । र फडक्यानं दादा ॥ दादा र जी र दाजी जी ॥१॥

हत्ती बघा आलाय रानाला । आलाय बघा बसाउ रानाला । पन रानामंदी परकार काय झाला । हत्ती त्यो गरकन् मागं फिरला । हत्ती बघा तुजला ढेंकनाला ! ढेंकुन लागला गुरगुरायला साहेब लागला माव-

गावला । लागला थरथर कांपायला । घाम मान्या सुटल्याय अंगाला । पाठमिळी वमली त्या वेळला । नायमाबाची दादा० ॥२॥

वर्दी बघा कळली सरकाराला । साहेब रानांत धावला । मग हिमत आली सरकाराला । घोडा तवा फेकल्याय रानाला । बिगीथान आला त्या रानाला । बघतुया परकार काय झाला । साहेब पडलाय जिमनीला ॥ अन ढेंकुन लागला गुरगुरायला । मग अवसान चढलं सरकाराला । हात बघा घातला बंदुकीला ॥ गोळ्या तीन भरल्या बंदुकीला ॥ कडकड झाडल्या ढेंकनाला । एक गोळी बसली मानेला । गोळी जवा घुसलीया मानेला । ढेंकुन लागला धडपडायला । ढेंकुन तिन दिस धडपडला । चौथ्या दिशिच्या मध्यानीला । ढेंकुन मेलाय त्या रानाला । एकलाच ॥ दादा ॥ ३ ॥

त्याच्या होर परकार काय झाला । रावसाय सांगतो मी तुम्हाला । पावाडा आता लावगो शेवटाला । पन इनंनी एक सान्या जनाला । पैसा बघा घेऊंदे शाहीराला । टोपिवाल लागल्यात डुलायला । पटकेवाल लागल्यात हंसायला । पैलवान लागल्यात मुलायला । हात बघा घातला पाकिटाला । लागलं बघा पैसं फेकायला । तांबडं नाणं नको शाहिराला । पांढरं नाणं येऊं दे आघाडीला । नांव तुमचं लावतों पोवाड्याला । कीर्त बघा गेली दिरतिमीला । लावला हुता पवाडा मुंबईला । गिरांटरोड पुलाच्या वाजूला । खडक पारशाच्या नाक्याला । चौपाटीच्या मैदानाला । वाळकेसराच्या टेकडीला । पुन्याच्या रे मार्कीटाला । आईतवारी मोठ्या बाजाराला । शनवारवाड्याच्या मैदानाला । किर्लुस्कराच्या कारखान्याला । बगल्या बल्यास पवाडकरीला ॥ वडी वडी जमली हुती ऐकायला ॥ कुनी कुनी दिलं पागुट्याला । कुनी कुनी दिल अंगराख्याला । हितं सारी लागल्यात डुलायला ॥ पन कवडा बघा दिसना या जाग्याला ॥ मानसं का लागली पांगायाला ॥ रामभाऊ लागल्यात पळायला ॥ पळू नगा हानात मंडळीन्ला ॥ पैसा नको तुमचा शाहिराला ॥ इगत केली मन पारखायला॥ ऐका बसून पवाड्याला ॥ फुकट्यानं दादा ॥ ४ ॥

---